महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
सोमवार, दिनांक १ एप्रिल, २०१३
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(अ) : सोमवार, दिनांक १८ मार्च, २०१३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्रीमती मीरा रेंगे-पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०५०३६ **"सार्वजनिक बांधकाम विभाग (जि.परभणी) येथील कार्यकारी अभियंत्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याबाबत".**

(ब) : तारांकित प्रश्न.

(क) : सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) उप मुख्यमंत्री :

(अ) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ब) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ड) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) गृह मंत्री : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा अडतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).

सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)

(१) **श्री.चंद्रदीप नरके,** डॉ.सुजित मिणचेकर, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, किसन कथोरे, कृषिभुषण साहेबराव पाटील, सुभाष देसाई, महादेव बाबर, प्रकाश (बाळा) सावंत, विनोद घोसाळकर, आर.एम.वाणी, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री. विवेक पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ४४ जिल्ह्यांमधील १२३ तालुक्यांचा समावेश इको-सेन्सिटिव्ह झोनमध्ये करण्यात आलेला असणे, त्यामध्ये विशेषत: कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी, भुदरगड, कागल, गडहिंग्लज, आजरा, चंदगड या तालुक्यांचा पश्चिम घाट रांगेत समावेश होत असून कोल्हापूर जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्राच्या ३० टक्के अधिक क्षेत्र प्रतिबंधित, नाविकास, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने घोषित केले असणे, राष्ट्रीय स्तरावर ३० टक्के क्षेत्राचा विचार केला तर, राष्ट्रीय पर्यावरण वृध्दी आणि संगोपन योजनांमध्ये जिल्हयाचा मोठा सहभाग असून ग्रामस्वच्छता अभियान, बायोगॅस संकल्प, इकोफ्रेंडली व्हिलेज इत्यादी पर्यावरण पूरक योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये येथील सर्व राजकीय, सामाजिक घटकांबरोबरच जनतेचे मोठे योगदान असणे, याशिवाय जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्राच्या ७५ टक्के क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले तर, जिल्हयाच्या संपूर्ण कृषी, रहिवाशी आणि उद्योग विकासावर विपरीत परिणाम होणार असणे, तसेच या तालुक्यातील धरणे व लघु पाटबंधारे प्रकल्पातील पाणी शेतीसाठी उपलब्ध करून देण्यास निर्बंध येणे, शासनाच्या इको-सेन्सिटीव्ह झोनमध्ये डॉ.गाडगीळ समितीने पश्चिम घाटाचे विविध भागांमध्ये वर्गीकरण केले असणे, त्यामध्ये अतिउच्चतम संवेदनशील क्षेत्र (ESZ-१), उच्चतम संवेदनशील क्षेत्र (ESZ-२), साधारण संवेदनशील क्षेत्र (ESZ-३), अशी वर्गवारी केली असणे, त्यामध्ये ESZ-१ या वर्गवारीत पन्हाळा, गगनबावडा, शाहूवाडी, राधानगरी, भुदरगड, ESZ-२ मध्ये कागल, ESZ-३ मध्ये गडहिंग्लज, आजरा, चंदगड या तालुक्यांचा समावेश असणे, इको-सेन्सिटिव्ह झोन संदर्भात शासनाच्या डॉ.माधवराव गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशीमध्ये शेतीचे रूपांतर बिगर शेतीत पूर्णत: बंद, मातीच्या वरील स्तरांचे संवर्धन म्हणून मुरूम काढणे बंद, विटा बनविणे बंद, जमिनीवर पेव्हींग करावयाचे नाही, निलगिरी सारख्या झाडांच्या लागवडीस निर्बंध तसेच स्थानिक प्रजाती सोडून इतर प्रदेशातील प्रजाती लागवडीस बंदी, रासायनिक किटकनाशके/तणनाशके, रासायनिक खतांचा वापर ठराविक कालावधीनंतर हद्दपार, खाणकाम फक्त ESZ-१ मध्ये २०१६ पर्यंत टप्प्याटप्प्याने

बंदी, ESZ-२ व ESZ-३ मध्ये अटींखाली परवानगी, नवीन वाळू उत्खनन व दगड खाण उद्योगासाठी ESZ-१ मध्ये बंदी, ३०-५० वर्षे जुने धरण व औष्णिक प्रकल्प टप्प्याटप्प्याने बंद, नवीन औष्णिक ऊर्जा किंवा पवनऊर्जा प्रकल्पांना मनाई तसेच जलविद्युत प्रकल्प १० मेगावॅटचे खाली मान्यता ते सुध्दा जाचक अटींखाली, नवीन महामार्ग, द्रुतगती मार्ग वाहतूक यांना परवानगी नाही, रेल्वे मार्ग, मोठे रस्ते यांना जाचक अटी लागू असणे, या सर्व अटींमुळे समाज व्यवस्था कोलमडून पडणार असून जनतेचा विकास व योग्य राहणीमानाचा मूलभूत हक्क काढून घेण्यासारखे होणार असणे, त्यामुळे मागासलेपणा आणि बेकारी वाढविणाऱ्या तसेच काही पर्यावरणवादी संघटनांच्या अट्टाहासापोटी नॅशनल ग्रीन ट्रॅब्युनल, दिल्ली यांचे माध्यमातून घटनात्मक चौकट सोडून जबरदस्तीने लादले जात असणे, इको-सेन्सिटिव्ह झोनकरीता दुर्गम भागातील तालुक्यांची निवड केल्याने जनजीवनावर त्याचा विपरीत परिणाम होणे, तसेच पश्चिम घाटाच्या सर्वकष विकासासाठी अभ्यास करण्यास केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या डॉ.कस्तुरीरंगन समितीने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी सिंधुदूर्ग जिल्ह्याला भेट देऊन पश्चिम घाटाच्या संवर्धनाविषयी डॉ.माधवराव गाडगीळ अहवालाच्या शिफारसीच्या पुनर्विलोकनासाठी पश्चिम घाटाच्या सिंधुदूर्गातील भागाच्या संवर्धनासाठी राज्य शासन करीत असलेल्या उपाययोजनांचे अवलोकन करण्यासाठी डॉ.कस्तुरीरंगन यांनी सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात बैठक घेऊन डॉ.माधवराव गाडगीळ समिती अहवालासंदर्भात जनतेने मांडलेल्या सूचनांचा समिती गांभीर्याने विचार करीत आहे व जिल्ह्याचा पर्यावरणपूरक विकास करणाऱ्यावर पश्चिम घाट संवर्धन समिती आग्रही राहील व सिंधुदूर्गवासीयांच्या भावना व विरोध केंद्रापर्यत पोचविला जाईल असे डॉ.कस्तुरीरंगन यांनी बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने शासनाची विशेषत: कोल्हापूर-रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या विकासाबाबत भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ व ३)

(२) **सर्वश्री जितेंद्र आव्हाड**, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, विष्णू सवरा, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे येथील मुंब्रा परिसरामध्ये सद्यस्थितीत मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण झालेली असल्याची माहे मार्च, २०१३ मध्ये उघडकीस आलेली गंभीर माहिती, वाढत्या लोकसंख्येला नियमित पाणीपुरवठा करण्यास महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपयश येत असल्याने निर्माण झालेली परिस्थिती, मुंब्रा, कौसा भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, मुंब्रा विभागातील पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी राबविण्यात येत असलेली १२० कोटी रुपयांच्या योजनेची कार्यवाही अत्यंत संथगतीने सुरू असणे, मुंब्रा विभागातील नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधितांसमवेत अनेकदा बैठका घेण्यात आलेल्या असणे, विधानसभा सभागृहामध्ये वारंवार उपस्थित केलेल्या चर्चेच्या वेळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री तसेच नगरविकास राज्यमंत्री यांनी आश्वासित केले असतानाही अद्यापपर्यंत येथील पाणीपुरवठा सुरळीत झालेला नसल्याने येथील लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्थांनी मा.मुख्यमंत्री,

आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे दिनांक ०४ मार्च, २०१३ तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंब्रा परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याने निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, मुबलक पाणीपुरवठा केला जावा याकरिता मुंब्रा प्रभाग समित्यांवर केली जात असलेली आंदोलने, विधीमंडळाच्या अधिवेशनात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा दिलेला इशारा, मुंब्रा परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात प्रशासनाचे हेतूपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(३) **सर्वश्री नाना पटोले,** गोवर्धन शर्मा, हरिष पिंपळे, डॉ.संजय कुटे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, विजय वडेट्टीवार, राजकुमार बडोले, संभाजी पवार, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून विविध सवलती मिळत असणे,राज्यात दारिद्रयरेषेखालील कुटुंबासाठी उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रूपये २१,००० असून हल्लीच्या महागाईच्या काळात कोणत्याही कुटुंबाच्या उत्पन्नाची मर्यादा रूपये २१,००० च्या वर असून ही कालबाह्य गोष्ट असणे, त्यामुळे दारिद्रयरेषेखालील उत्पन्नाचे दाखले घेण्यासाठी खोटी शपथ घेऊन तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना लाच देऊन बनावट उत्पन्नाचे दाखले घेत असणे, कोणत्याही ४ व्यक्तींच्या कुटुंबाच्या गरजा रूपये २१००० उत्पन्नामध्ये वर्षभर भागविणे शक्यच नसणे, असे असताना दारिद्रयरेषेखालील व्यक्तींचा लाभ मिळविण्यासाठी बनावट दाखले घेतले जात असणे, त्यामुळे दारिद्रयरेषेखालील कुटुंबासाठी लावण्यात येणाऱ्या निकषांमध्ये बदल करुन व सुधारित यादी तयार करून दारिद्रयरेषेसाठी असणाऱ्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा किमान १ लाख रूपये करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

सात : लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-

दुग्धविकास मंत्री : **"मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व), आरे दुग्धवसाहत येथील आदिवासी पाडे हे मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असणे."** या विषयावरील सर्वश्री रविंद्र वायकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २५ मार्च, २०१० रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर)

आठ : अल्पकालीन चर्चा - (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-

(दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अल्पकालीन चर्चेची सूचना)

सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, प्रा. राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे (पाटील), डॉ. संजय कुटे, श्री. गोवर्धन शर्मा, डॉ. खुशाल बोपचे, श्री. सुभाष देसाई, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-

"दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथे तीन अल्पवयीन बहिणींवर बलात्कार होऊन त्यांची हत्या करण्यात आल्याची भीषण घटना घडणे, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या अमानवीय घटनेमुळे भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळणे, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलीसांना अद्याप यश आलेले नसणे, शासनाच्या वतीने नऊ पोलिस पथकांची नियुक्ती करण्यात येणे, तथापि सदरची घटना घडून २६ दिवसांचा कालावधी उलटूनही खरे आरोपी अद्यापही मोकाटच असणे, आरोपींचा त्वरित शोध घेण्याकरिता व त्यांना कठोर शिक्षा होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणे, या घटनेच्या निषेधार्थ मशाल मोर्चाही काढण्यात येणे, या घटनेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने राज्य शासनाला अहवाल सादर करण्यासाठी नोटीस दिली असणे, या घटनेबाबत अलिकडेच प्राप्त झालेल्या शवविच्छेदन व फॉरेन्सिक अहवालात उघडकीस आलेली मतभिन्नता, शासनाने सदर घटनेचा तपास तात्काळ सीबीआयमार्फत करण्याची आवश्यकता व मुलींच्या आईला आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे दलित महिलेचे अपहरण करुन तिच्यावर अमानुष अत्याचार करणे, आरोपी दानीश शेख व अमन शेख हे उपनगराध्यक्षांचे पुतणे असणे, पोलिसांनी तब्बल चार दिवस गुन्हा नोंद न करणे व अतिरिक्त पोलिस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतरच आरोपींना अटक होणे, सदर आरोपी संघटित गुन्हेगारी टोळी चालवित असल्यामुळे त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याप्रमाणे कारवाई होण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे कुही, जि.नागपूर येथे आदिवासी समाजाच्या घरावर दरोडा टाकून मुलीवर केलेल्या बलात्काराची नुकतीच घडलेली घटना, श्रीरामपूर व कुही येथील पीडित कुटुंबांनाही शासनाकडून कोणतीही मदत न मिळणे, एकूणच राज्यातील दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय महिलांवर वाढत असलेले अत्याचाराचे प्रमाण, त्यांच्या होणाऱ्या हत्येच्या घटना व या घटनांमधील आरोपींना अटक करण्यात शासनाला येत असलेले अपयश, दलित व आदिवासी समाजामध्ये याबाबत पसरत असलेला प्रचंड असंतोष, आरोपींना त्वरित अटक करण्याची व पीडितांना तातडीने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता."

नऊ : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(२) आदिवासी विकास विभाग.

(३) रोजगार व स्वयंरोजगार विभाग.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३० मार्च, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.